# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

*(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल**
**क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.६३/२०२३/अहिल्यानगर**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. संतोष सुर्यभान घोलप, रा. मु.पो. निंबळक, ता. जि. अहिल्यानगर - ४१४००१ | उपकार्यकारी अभियंता, मुळा पाटबंधारे विभाग, अहिल्यानगर, सिंचन भवन, नगर – छ. संभाजीनगर रोड, फकीरवाडा, अहिल्यानगर, ता.जि. अहिल्यानगर | कार्यकारी अभियंता, मुळा पाटबंधारे विभाग, अहिल्यानगर, सिंचन भवन, नगर – छ. संभाजीनगर रोड, फकीरवाडा, अहिल्यानगर, ता.जि. अहिल्यानगर |

**सुनावणी दिनांक – १६/०१/२०२५**

**१. उपस्थिती –**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| अनुपस्थित | ऑनलाईन उपस्थित | ऑनलाईन उपस्थित | ऑनलाईन उपस्थित | ऑनलाईन उपस्थित |

**२. द्वितीय अपील अर्ज –**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : २६/१२/२०२२

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार कायद्याचे उल्लंघन करत माहिती न दिल्याने.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळावी.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : १३/०९/२०२२

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १३/०९/२०२२

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सन २०२० ते माहिती मिळेपर्यंत

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :**
१) भांडार शाखेशी संबंधित श्री. कवडे हे ज्या पदावर कार्यरत आहेत, या पदनामाची व त्यांच्या कार्यकाळाची माहिती. (२) मुख्य भांडारपाल म्हणून सन २०२० ते आजपर्यंत कार्यरत व्यक्तींच्या कार्यकाळाची नाव व तारखांसह माहिती. (३) मुख्य भांडारपाल म्हणून कार्यरत अधिकाऱ्यांच्या मागिल दोन वर्षातील हजेरीची माहिती व हजेरी रजिस्टरची छायांकित प्रत व शाखेतील मागिल सहा महिन्याचे CCTV फुटेज.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**
सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, मुळा पाटबंधारे विभाग, अहिल्यानगर, ता.जि. अहिल्यानगर यांनी दि.२२/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग संकीर्ण २०१२/९८९/प्र.क्र.४७९/सहा. मुंबई या दि.१७/१०/२०१४ चे परिपत्रकानुसार शासकीय कर्मचारी/अधिकारी माहिती ही, वैयक्तीक स्वरुपाची असल्याचे दिसून येते. तसेच या माहिती मध्ये व्यापक जनहित दिसून येत नाही. म्हणून वैयक्तीक स्वरुपाची माहिती देण्याचे बंधन माहिती अधिकारी यांच्यावर नसल्याचा निर्णय स्पेशल लिव्हपिटिशन क्र.२७७३४/२०१२ दि.०३/१०/२०१२ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आहे. तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ पोटकलम (जे) मधील तरतुदीनुसार जी माहिती देण्याचे बंधन माहिती अधिकारी यांच्यावर नाही अशी आणि लोकहीताच्या दृष्टीने व्यापक जनहित साध्य न करणारी किंवा विशेषत: जी त्रयस्थ पक्षाबरोबर उद्भवलेल्या वैयक्तीक वादाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती ही माहितीच्या अधिकारात देण्यात येवू नये, त्यामुळे माहिती देणे बंधनकारक नसल्याचे अपीलार्थीस कळविण्यात आल्याचे दिसून येते.

४. **प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ०४/१०/२०२२

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०४/१०/२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती मिळाली नाही.

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**
अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, मुळा पाटबंधारे विभाग, अहिल्यानगर, ता.जि. अहिल्यानगर यांनी दि.१०/११/२०२२ रोजी सुनावणी घेवून त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेला पत्रव्यवहार विचारात घेता अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही कुठलेही समाजहीत साध्य न करु शकणारी आहे. त्यामुळे सदरची माहिती देणे जन माहिती अधिकारी यांच्यावर बंधनकारक नाही. तथापि, सदरच्या माहितीने कोणतेही लोकहीत तथा समाजहीत साध्य होते हे अपीलार्थी सिध्द न करु शकल्याने त्यांना माहिती मिळू शकलेली नाही. त्यामुळे सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी वस्तुस्थितीदर्शक व विहीत कार्यवाही केल्याचे दिसून येते, त्यामुळे सदरचे प्रथम अपील निकाली काढण्यात आल्याचे दिसून येते.

५. **युक्तिवाद/लेखी खुलासा –**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी - जन माहिती अधिकारी यांनी दि.२२/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग संकीर्ण २०१२/९८९/प्र.क्र.४७९/सहा. मुंबई या दि.१७/१०/२०१४ चे परिपत्रकानुसार शासकीय कर्मचारी/अधिकारी माहिती ही, वैयक्तीक स्वरुपाची असल्याचे दिसून येते. तसेच या माहिती मध्ये व्यापक जनहित दिसून येत नाही. म्हणून वैयक्तीक स्वरुपाची माहिती देण्याचे बंधन माहिती अधिकारी यांच्यावर नसल्याचा निर्णय स्पेशल लिव्हपिटिशन क्र.२७७३४/२०१२ दि.०३/१०/२०१२ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आहे. तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ पोटकलम (जे) मधील तरतुदीनुसार जी माहिती देण्याचे बंधन माहिती अधिकारी यांच्यावर नाही अशी आणि लोकहीताच्या दृष्टीने व्यापक जनहित साध्य न करणारी किंवा विशेषत: जी त्रयस्थ पक्षाबरोबर उद्भवलेल्या वैयक्तीक वादाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती ही माहितीच्या अधिकारात देण्यात येवू नये, त्यामुळे माहिती देणे बंधनकार नसल्याचे अपीलार्थीस कळविण्यात आले आहे.

६. **निष्कर्ष –**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.२२/०९/२०२२ च्या पत्रान्वये अपीलार्थी यांना वस्तुस्थितीदर्शक उत्तर दिल्याचे दिसून येते.

२) तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.१०/११/२०२२ रोजी सुनावणी घेवून आदेश पारित केल्याचे दिसून येते.

३) अपीलार्थी यांनी माहिती अर्जात सन २०२० ते माहिती मिळेपर्यंत असा कालावधी नमूद केला असून विशिष्ट दिनांक नमूद केलेला नसल्याने माहिती अर्ज मोघम ठरतो.

४) अपीलार्थी सुनावणीस अनुपस्थित असल्यामूळे नेमकी श्री. कवडे यांच्या कार्यकाळातील कोणती माहिती हवी आहे यांच्या उलगडा हाऊ शकला नाही

सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक.६३/२०२३/अहिल्यानगर निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

जावक क्र. ४८२३ दिनांक :- 23 JUN 2025